अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. १५ मे २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : २२५ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## अक्षता पडल्या अन् सकाळी नवरीला देवाज्ञा




**अकलूज** : आयुष्याच्या टप्प्यावर सर्वात महत्त्वाचा मानला जाणारा लग्न सोहळा पार पडला आणि दुसऱ्या दिवशी सकाळीच नववधुला हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने प्राण सोडावा लागल्याची हृदय पिळवून टाकणारी घटना बाभुळगाव (ता माळशिरस ) येथे पराडे -गळगुंडे या परिवारांत घडली असल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे .

समीर हरिदास पराडे यांचे १३ में रोजी घोटी (ता .माढा ) येथील जानकी बाळासाहेब गळगुंडे यांच्याशी मोठया दिमाखात विवाह सोहळा निरा नरसिंहपूर येथील मंगल कार्यालयात संपन्न झाला होता.लग्नानंतर नववधू सासरी आली.दुसऱ्या दिवशी सकाळी अचानक छातीत कळा येऊ लागल्याने.

तात्काळ अकलूज येथील अश्विनी हॉस्पिटल येथे घेऊन जात असतानाच प्रवासा दरम्यान नववधू वर काळाने झडप घातली .सासरच्या सुनेचा व माहेरच्या लेकींचा अचानक झालेल्या मृत्युने दोन्ही कुटुंबाने टाहो फोडला होता. मृत्यू झालेल्या कै.जानकी हिच्यावर बाभुळगाव येथे शोकाकुल वातावरणात अंतीम संस्कार करण्यात आले

## जन्मदात्रीचे अमानुष कृत्य

# पोटच्या ४ वर्षाच्या मुलीची हत्या करून स्वतःही गळफास घेवून केली आत्महत्या



**मंगळवेढा/प्रतिनिधी**

**गुरूवारी साऱ्या जगात एकत्र कुटुंब दिन साजरा केला जाणार आहे.आज सर्वत्र कुटुंबामध्ये कलह दिसून येत आहे तसेच घरगुती हिंसाचारही बळावत चालल आहे.या दिनाच्या दिवशी एकत्र कुटुंबाविषयी जनजागृती केली जात असते मात्र या दिनाची सर्वत्र चर्चा होत असतानाच मंगळवेढा तालुक्यातील डोणज या गावात एक धक्कादायक घटना घडली. एका पीडित मातेने पहिल्यांदा चार वर्षाच्या मुलीला गळफास लावून जीवे ठार मारले. त्यानंतर तिने स्वतःही गळफास घेवून जीवन संपवले.या प्रकाराने तालुक्यात खळबळ उडाली आहे.**

### मंगळवेढा तालुक्यातील डोणज गावामधील थरार

स्नेहल उर्फ स्नेहा दत्ता तेली असे त्या मातेचे नाव असून मुलीचे नाव मैथली असे आहे.ही घटना मंगळवारी सकाळी घडली.

याबाबतचे वृत्त असे की,डोणज हे स्नेहलचे माहेर आहे.तिला सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील नेर्ले या गावात लग्न करून दिले होते.

.स्नेहलचा नवरा माथाडी कामगार होता. त्याला व्यसन आहे. सासरी सतत कुरबुरी व्हायच्या. त्याला कंटाळून ती आईकडे रहायला आली होती. घरात तिचे आई-वडील व आजी होती. दार बंद करून तिने गळफास घेतला. बराच वेळ होवूनही दार न उघडल्याने आई-वडील यांना संयश आला. दार फोडून आत पाहिल्यानंतर आई आणि मुलगी गळफास घेतलेल्या स्थितीत दिसले. सिद्धाराम बिराजदार यांनी फावड्याने ओढणी तोडून स्नेहलला खाली घेतले. बिराजदार यांनी फिर्याद दिल्यानंतर पोलीस घटनास्थळी येवून पंचनामा केला.

सासरच्या घरात सतत कुरबुरी होत होत्या.त्याला कंटाळून ती माहेरी डोणज या गावी आईकडे गेल्या दीड वर्षांपासून राहात होती.

माहेरी राहातानाही ती तणावाखाली होती.त्यातूनच तिने पहिल्यांदा पोटच्या ४ वर्षाच्या मुलीला ओढणीने गळफास देवून जीवे ठार मारले त्यानंतर तिने स्वतः माळवदाच्या कडीला गळफास घेवून आत्महत्या केली.

स्नेहलचे मेव्हणे सिद्धाराम हणमंत बिराजदार रा,नंदूर ता.मंगळवेढा यांनी मंगळवेढा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस निरीक्षक बोरिगिड्डे हे करत आहेत.

## मित्राला दगडाने ठेचून वॅनरमध्ये गुंडाळत काढला पळ



- वेशुद्ध मित्र वॅनरमध्ये झाला गार
- कायमचे संपविण्यापर्यंत गेले वैरत्व
- दारु पित असताना लागले भांडण
- भांडणाचे पर्यवसान झाले हत्येत

**सोलापूर/प्रतिनिधी**

मित्र झाला मित्राचा दुष्मन झाला. कायमचे संपविण्यापर्यंत दोघांमधील वैरत्व गेले. दारुचे घोट घेत असताना भांडण-तंटा सुरु झाला. दोघांमधील भांडणे विकोपाला गेली. शेवटी मित्राबद्दल संताप अनावर झाला. दुष्मनी उफाळली. मित्राच्या डोक्यात दगड घालण्यात आला. दगडाने ठेचून मित्राला गार केले. मित्राने मान टाकली.

तो कायमचा गार झाल्याचे लक्षात येताच मारेकरी मित्राची नशा उतरली. बॅनरमध्ये मित्राला गुंडाळून पळ काढला. मात्र शेवटी खुनाचा वाचा फुटलीच. दरम्यान घटनेच्या पार्श्वभूमीवर, मारेकरी मित्राला पोलिसांनी इंगा दाखवला आणि त्याला गजाआड केले. ही घटना देगांव परिसरात घुंगे यांच्या रत्नाई शिवार प्लॉटींगमध्ये लिंबाच्या झाडाखाली, ६ मे २०२५ रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास घडली. दुर्गप्पा ऊर्फ रमेश भिमय्या पवार (वय- ४२ वर्षे) असे मृताचे नांव आहे. त्याच्या हत्येप्रकरणी दाखल गुन्ह्यात सलगर वस्ती पोलीसांनी आरोपी मुरसा ऊर्फ मुन्ना अब्दुली शेख याला गजाआड केले आहे.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, शेजारच्या गुलबर्गा जिल्ह्यातील खणदाळ येथील रहिवासी दुर्गप्पा ऊर्फ रमेश भिमय्या पवार त्याचा मित्र मुरसा ऊर्फ मुन्ना अब्दुली शेख (रिंग रोड, सिध्देश्वर मठाजवळ, गुलबर्गा) घुंगे यांच्या रत्नाई शिवार प्लॉटींगमध्ये असणाऱ्या लिंबाच्या झाडाखाली दारू पित बसले होते. दरम्यान त्यांच्यात अज्ञात कारणावरून बाचाबाची झाली, त्याचे पर्यवसान हाणामारीत झालं. त्यात मुरसा याने दुर्गप्पा याचे डोके लिंबाच्या झाडावर आपटले, त्यात तो खाली पडला असता, त्याने दुर्गप्पाला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने तेथे पडलेल्या दगडाने त्याच्या डोक्यात मारले, तेव्हा त्याच्या डोक्यातून अति रक्तस्त्राव होऊन तो बेशुध्द झाला. मुरसाने बेशुध्द अवस्थेतील दुर्गप्पाला तेथे पडलेल्या बॅनरमध्ये गुंडाळून ठेऊन घटनास्थळावरून पोबारा केला. त्यातच दुर्गप्पाचा मृत्यू झाला. या प्रकरणी मृताची पत्नी लक्ष्मी हिने सलगर वस्ती पोलीस ठाण्यात पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्यानुसार मुरसा ऊर्फ मुन्ना अब्दुली शेख याच्याविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) प्रमाणे मंगळवारी सायंकाळी गुन्हा दाखल केला. या गुन्ह्यात आरोपीस गजाआड करण्यात आलंय. पोलीस उपनिरीक्षक कुतवळ या गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

## राज्यातील देवस्थान जमिनींबाबत महसूलमंत्र्यांचा कडक निर्णय

### प्रशासनाला सक्त सूचना

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यात देवस्थान इनाम जमिनी मोठ्या प्रमाणावर आहेत. या देवस्थान जमीनींचे खरेदी-विक्री व्यवहार केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे देवस्थान जमिनीबाबत राज्य सरकार धोरण ठरवत आहे. तोपर्यंत या जमिनींची दस्त नोंदणी करणे थांबवण्यात यावी, असे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. त्याबरोबरच कोल्हापूर शहर आणि उपनगरे नक्शा योजनेमध्ये बसवून सर्व्हे करण्यात यावा, असंही त्यांनी यावेळी सांगितलं.


मंत्रालयात पश्चिम महाराष्ट्र देवस्थानच्या जमिनीबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी महसूलमंत्री बावनकुळे बोलत होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आमदार अमल महाडिक तर दूरदृश्य प्रणालीद्वारे कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे उपस्थित होते.



चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, देवस्थान इनाम मिळकतीच्या अनुषंगाने शासन स्तरावर धोरण ठरवण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगी खेरीज किंवा न्यायालयाचे आदेश असतील त्याशिवाय राज्यातील सर्व देवस्थानच्या खरेदी आणि विक्रीच्या व्यवहारांची नोंदणी केली जाऊ नये. जर व्यवहार झाले तर त्यास दुय्यम निबंधक यांना जबाबदार धरण्यात येईल, असा इशारा बावनकुळे यांनी दिला आहे.

कोल्हापूर शहराचा झपाट्याने विकास होत वाढीव गावठाणाचा सर्व्हे करुन प्रॉपर्टी कार्ड मिळावे, अशी मागणीही यावेळी बैठकीत करण्यात आली होती. त्याबाबत मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्ह्यातील शंभर गावांचा समावेश सर्व्हे नक्शा या प्रणालीमध्ये करुन पायलट प्रकल्प तयार करावा, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या.

## महाराष्ट्राचे सुपुत्र न्या.बी.आर. गवईंना सरन्यायाधीशपदाचा बहुमान



**नवी दिल्ली**

न्या. भूषण रामकृष्ण गवई यांनी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून बुधवारी शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राष्ट्रपती भवन येथे त्यांना शपथ दिली. माजी सरन्यायाधीश संजीव खन्ना हे मंगळवारी १३ मे रोजी निवृत्त झाले. बी. आर. गवई हे आता २३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत भारताचे सरन्यायाधीश म्हणून काम पाहणार आहेत.

बी. आर. गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी झाला असून ते महाराष्ट्रातील अमरावती येथील रहिवासी आहेत. सामाजिक कार्यकर्ते आणि बिहार व केरळचे माजी राज्यपाल दिवंगत आर. एस. गवई यांचे ते पुत्र आहेत. महाराष्ट्रातील अमरावती येथील रहिवासी असलेले न्यायमूर्ती गवई १६ मार्च १९८५ रोजी बार कौन्सिलमध्ये सामील झाले आणि १९८७ पर्यंत माजी म हाधिवक्ता आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश राजा एस. भोसले यांच्याबरोबर त्यांनी काम केले. १९९० नंतर त्यांनी प्रामुख्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर संवैधानिक आणि प्रशासकीय कायद्यात प्रॅक्टिस केली. ते नागपूर महानगरपालिका, अमरावती महानगरपालिका आणि अमरावती विद्यापीठाचे स्थायी वकील देखील होते.

ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात न्यायमूर्ती गवई यांची सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली. १७ जानेवारी २००० पासून ते सरकारी वकील म्हणून नियुक्त झाले. १४ नोव्हेंबर २००३ रोजी त्यांना मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून बढती देण्यात आली आणि १२ नोव्हेंबर २००५ रोजी ते उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती गवई हे अनेक महत्त्वाच्या निर्णयांचा भाग राहिले आहेत. जानेवारी २०२३ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या नोटबंदीवरील निकालाच्या खंडपीठाचा ते भाग होते. त्यांनी केंद्राच्या २०१६ च्या ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा चलनातून रद्द करण्याच्या निर्णयाला मान्यता दिली होती. २०१६ च्या नोटाबंदीचे गवई यांनी समर्थन केले होते.

## मेंढपाळास डांबून ठेऊन मारहाण; तिघांवर गुन्हा

### वरकुटे येथील घटना

**सोलापूर** : शेतात मेंढ्या गेल्याच्या कारणावरून कर्नाटकातील मेंढपाळास डांबून ठेवून मारहाण करण्यात आली. ही घटना वरकुटे (ता. मोहोळ) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. या प्रकरणी मोहोळच्या पोलिसांनी वरकुटे येथील तिघांवर गुन्हा दाखल केला आहे .

या संदर्भात राजू रावसाहेब कोळेकर (वय १९ रा. चिक्कोडी जि. बेळगाव, कर्नाटक) यांनी पोलिसात नुकतीच फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी सोमनाथ महादेव बचुटे, त्याचा भाऊ ऋषिकेश बचुटे आणि वडील महादेव बचुटे (सर्व रा. वरकुटे) या तिघां विरुद्ध गुन्हा दाखल केला.राजू कोळेकर मेंढपाळ असून त्यांनी त्यांच्या ५५० ते ६०० मेंढरे वरकुटे येथील शिवाजी गुंड -पाटील यांच्या शेतात बसवले होते. त्यापैकी काही मेंढया सकाळच्या सुमारास शेजारील सोमनाथ बचुटे यांच्या शेतात गेल्या होत्या. त्यामुळे चिडून वरील तिघांनी त्यांना आणि त्यांच्या नातेवाईकांना बेदम मारहाण केली . आणि राजू कोळेकर यांना आरोपीच्या वस्तीवर डांबून ठेवून पाईपने मारहाण केली. असे त्यांच्या फिर्यादी नमूद आहे.पुढील तपास

## रोख रकमेसह २ लाखांची चोरी; नातेवाईक महिलेस अटक

### बऱ्हाणपूर येथील घटना

**अक्कलकोट** : लग्नासाठी पुण्याहून आलेल्या महिलेने नातेवाईकाच्या घरातून रोख रकमेसह १ लाख ९० हजारांचे दागिने पळविल्याचे पोलिसांच्या तपासात उघडकीस आले. ही घटना बऱ्हाणपूर (ता. अक्कलकोट) येथे ९ ते १२ मे या दरम्यान घडली होती.

याप्रकरणी सुनंदा मारुती बनसोडे (रा. बऱ्हाणपूर, ता.अक्कलकोट) यांनी एका त्यांच्या नात्यातील एका संशयित महिलेविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल केली होती. त्याप्रमाणे पोलिसांनी वडगाव शेरी (पुणे) येथील एका महिलेला अटक करून चोरीस गेलेला माल जप्त केला.अक्कलकोट येथे लग्न असल्यामुळे सुनंदा बनसोडे यांच्या परिसरातील काही पाहुणे पुण्याहून त्यांच्या घरात आले होते. ११ मे रोजी सुनंदा बनसोडे यांच्या घरात असलेल्या कपाटातून ३५ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि ५० हजार रुपये रोख गायब झाल्याचे त्यांना दिसून आले. त्यानंतर त्यांनी शोधाशोध करून एका संशयित महिलेविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल केली होती. त्याप्रमाणे पोलिसांनी वडगाव शेरी येथील एका २६ वर्षीय महिलेस अटक करून चोरीस गेलेला ऐवज नुकताच जप्त केला. पुढील तपास हवालदार कलेशेट्टी हे करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्यांच्या मुलाला नव्याण्णव पूर्णांक नव्याण्णव मिळाले, एक गुण कमी पडला!

संगम श्री डे
349-66-240

संगम श्री नाईट
148-39-234

कल्याण
278-74-590


मुंबई
124-71-588

## बिटरगावच्या मुरुमकर परिवारावर जणू नियती कोपली सुनेनंतर आठ दिवसातच सासऱ्याची जीवनयात्रा संपली

**सोलापूर/प्रतिनिधी**

**नियती कधी आणि कोणावर कोपेल हे सांगता येत नाही. त्याचाच प्रत्यय सैराट सिनेमाच्या प्रदर्शनानंतर चर्चेत आलेल्या करमाळा तालुक्यातील बिटरगाव येथे आला आहे. येथील मुरुमकर परिवारावर जणू नियती कोपली आहे. केवळ आठच दिवसांपूर्वी सुनेचा मृत्यू झाला आणि त्यानंतर सासऱ्याची जीवयात्रा कायमची संपली. या दुर्दैवी घटनेने बिटरगावसह पंचक्रोशीत हळहळ व्यक्त केली जात आहे. हे गाव जणू शोकसागरात बुडाले आहे.**

### बिटरगावसह पंचक्रोशीत हळहळ गाव बुडाले शोकसागरात



त्याचे झाले असे की, शेतात काम करताना जखमी होऊन सुनेच्या अपघाती मृत्यूनंतर आठच दिवसाच्या आत सासऱ्याचे हृदयविकाराच्या तीव्र धक्याने निधन झाले आहे. मनीषा नितीन मुरूमकर (वय ३४) यांचा बुधवारी (ता. ७) नगरमध्ये रुग्णालयात उपचार सुरु असताना मृत्यू झाला होता. त्यातून सावरत असतानाच, लालासाहेब विनायक मुरूमकर (वय ६१) यांचे बुधवारी (ता. १४) मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास निधन झाले.

सून मनीषा मुरूमकर यांचा शेतात बोअरवेलमधील मोटार काढत असताना दावे तुटून लाकूड डोक्याला लागून उपचारा दरम्यान मृत्यू झाला होता.

या मृत्यूची सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात होती. त्यांच्या मागे पती, तीन मुले, सासू व सासरे होते. त्यांचा येत्या शुक्रवारी (ता. १६) दशक्रियाविधी होणार होता. त्या दुःखात असतानाच सासरे लालासाहेब मुरूमकर यांचे राहत्या घरीच हृदयविकाराच्या धक्याने निधन झाले. त्यांच्या मागे एक भाऊ, दोन बहिणी, एक मुलगा, पत्नी व नातवंडे असा परिवार आहे. ते बिटरगाव श्री विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष होते. सेवानिवृत्त आदर्श शिक्षक हंबीरराव मुरूमकर यांचे ते चुलत बंधू होते. माजी आमदार स्व. नामदेवराव जगताप यांचे विश्वासू सहकारी कै. भगवानराव शिंदे यांचे अत्यंत विश्वासू होते.